www.prepp.in

## UGC NET PAPER 2 JANUARY 22, 2017 SHIFT 1 MARATHI QUESTION PAPER

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

1. लिपी ही अर्थाशी साक्षात् संबद्ध नसते, तर ध्वनींच्या द्वारा संबद्ध असते.

(1) संपूर्ण विधान चूक  (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर  (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

2. मराठी भाषेच्या उपपत्तीच्या निमित्ताने 1922त 'विविधज्ञानविस्तारा'त लिहिलेल्या लेखाच्या आधारे मराठीतील गाजलेला कोणता वाद निर्माण झाला होता ?

(1) राजवाडे – गुणे वाद  (2) वैद्य – गुणे वाद

(3) आगरकर – टिळक वाद  (4) केतकर – प्रियोळकर वाद

3. भाषा ही ध्वनिरूप असते, तसेच भाषेची मांडणी करणारी व्यवस्थाही ध्वनिरूपच असते.

(1) संपूर्ण विधान चूक  (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर  (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

4. बोली-भेद प्रादेशिक वा भौगोलिक प्रदेशांवरून ठरविताना अन्य कोणत्या घटकाच्या आधारे भाषा-भेदांचा शोध घ्यावा लागतो ?

(1) सामाजिक रचनेमधील भेद  (2) भाषेच्या पारिभाषिक संज्ञांतील भेद

(3) शब्दांच्या अर्थविचारातील भेद  (4) भाषिक संप्रेषणातील भेद

Prepp
Your Personal Exams Guide

5. बोली शास्त्राच्या अभ्यासाची प्रमुख पद्धती म्हणजे –

(1) ज्या प्रदेशातील बोलींचा अभ्यास करायचा आहे, तेथील लोकांच्या बोलण्यातील विविध प्रयोगांचा वापर कोटे कोटे होतो, याविषयीची नोंद करण्याची ;

(2) भाषा भेदां विषयीचा अनेक प्रकारांचा पुरावा संकलित करून त्याचे वर्गीकरण करण्याची ;

(3) सामाजिक परिमाणांपेक्षा भौगोलिक सीमारेषांच्या आधारे भाषा-भेद शोधण्याची ;

(4) वांशिक अर्थमीमांसा करण्याची ;

6. भाषेत उपलब्ध असणारे शब्द पुरेसे न वाटल्याने नवे शब्द घडविणे वा उपलब्ध शब्दांना नवे रूप देणे, अशा भाषिक प्रवृत्तीला काय म्हणतात ?

(1) भाषिक व्यवस्था
(2) संकेतोल्लंघन
(3) शब्दक्रमघटित
(4) संरचनावादी

7. समानार्थता, विरुद्धार्थता, अनेकार्थता, अर्थसमावेश या अर्थसंबंधांचा कोणत्या अर्थविचारा मध्ये समावेश होतो ?

(1) संरचनावादी अर्थविचार
(2) भाषिक सापेक्षतावादी अर्थविचार
(3) निवडीवरील बंधनासंबंधीचे नियम
(4) सूक्ष्म वर्गीकरणाचे नियम

8. अत्तर, पेशवा, पोशाख, सामना हे शब्द पुढीलपैकी कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत ?

(1) हिंदी
(2) फारसी
(3) अरबी
(4) गुजराती

9. इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेला शके 1076 चिकुर्डे ताम्रपट मराठीविषयक कालनिर्णयाच्या संबंधाने कुचकामाचा आहे, असे कोणी सांगितले ?

(1) चिन्तामण विनायक वैद्य
(2) पांडुरंग दामोदर गुणे
(3) पांडुरंग वामन गाडगीळ
(4) पांडुरंग वामन काणे

Prepp
Your Personal Exams Guide

10. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमानुसार लिहिला आहे ?

(1) कादंबरीकल्पद्रूमपूष्पमाला
(2) कादंबरिकल्पद्रुमपुष्पमाला
(3) कादंबरिकल्पद्रुमपूष्पमाला
(4) कादंबरीकल्पद्रूमपुष्पमाला

11. शके 470 तील मानल्या गेलेल्या मंगळवेढे ताम्रपटाविषयीचे स्वत:च्या कालविषयक पूर्वमताचे स्वत:च निराकरण करून तो शके 1125 मधील असल्याचे मत कोणी मांडले ?

(1) रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर
(2) विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
(3) शंकर गोपाळ तुळपुळे
(4) अनंत काकबा प्रियोळकर

12. कवी नरेन्द्राच्या 2136 ओवीसंख्या असलेल्या 'रुक्मिणीस्वयंवर' काव्याचे संपादक कोण ?

(1) रमेश आवलगावकर
(2) सुरेश डोळके
(3) रा.चिं. ढेरे
(4) वि.भि. कोलते

13. बखर व तिचे संपादक यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| I. | भाऊसाहेबाची बखर | (A) | वि.सी. चितळे व शं.ना. जोशी |
| II. | साष्टीची बखर अर्थात् वसईचा दुर्धर संग्राम | (B) | गजानन गोविन्द नाईक |
| III. | पाणिपतची बखर | (C) | का.ना. साने |
| IV. | हरिवंशाची बखर अर्थात् पटवर्धन सरदारांच्या हकिकती | (D) | वासुदेवशास्त्री खरे |
| | | (E) | विश्वनाथ काशीनाथ राजवाडे |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | A | B | C | D |
| (2) | A | C | D | E |
| (3) | A | B | C | E |
| (4) | B | C | D | E |

Prepp Your Personal Exam Guide

14. "नलगे मज भुक्ती । नलगे मज मुक्ती" – हे काव्यचरण कोणाचे ?

(1) रघुनाथपण्डित (2) नामदेव

(3) समर्थ रामदास (4) मोरोपन्त

15. "दावलमलका पूजिती गदा । वर्षा फकीर होती एकदा ।"

– हे चरण कोणाच्या काव्यातील आहे ?

(1) समर्थ रामदासांनी 'शिवाजीमहाराजांना पाठविलेल्या पत्रातील'

(2) संत एकनाथांच्या 'हिंदुतुर्कसंवादा'तील

(3) शेख महंमदाच्या 'योगसंग्रामा'तील

(4) शहामुनीच्या 'सिद्धान्तबोधा'तील

16. लोलिम्बराज कवीच्या 'रत्नकलाचरित्र' काव्याचे बिल्हणाच्या शृंगारिक कथाभागाशी साम्य असले तरी मराठीतील एकमेव स्वयंकल्पित कथाकाव्य म्हणून ते विशेष उल्लेखनीय ठरते

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

17. "कीर्तनाचे रंगी आनंदे नाचता" असे कोणी म्हटले आहे ?

(1) नामदेव (2) मुक्ताबाई

(3) कान्होपात्रा (4) एकनाथ

18. "सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची नुरवी...." ही आरती कोणी रचली आहे ?

(1) विष्णुदास नामा (2) तुकाराम

(3) रामदास (4) कृष्णशास्त्री चिपळूणकर

Prepp
Your Personal Exams Guide

19. "सन्निधवासी शत्रू म्हणजे उदरातील व्याधी" असे शिवाजी महाराजांशी संबंधित कोणत्या ग्रंथात म्हटले आहे ?

(1) शिवदिग्विजय (2) शिवभारत

(3) सभासदाची बखर (4) आज्ञापत्र

20. 'सुभद्राचंपू' हे काव्य कोणी रचले ?

(1) सामराज (2) मोरोपंत

(3) श्रीधर (4) निरंजन माधव

21. जन्मवर्षानुसार शाहिरांचा क्रम लावा

(1) अनंत फंदी, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ

(2) अनंत फंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ

(3) रामजोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर

(4) रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, अनंत फंदी

22. 'नारायणराव पेशवे वध' हे काव्य कोणाचे ?

(1) गोविंद वासुदेव कानिटकर (2) मोरो गणेश लोंढे

(3) पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी (4) गंगाधर रामचंद्र मोगरे

23. "माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढे आहे सुंदर तो सरस वाङ्निष्यंद चोहीकडे"

– असे उद्विग्न संतप्त उत्तर वर्गातल्या शिक्षकांना कोणत्या कवीने दिले होते ?

(1) केशवसुत (2) बी

(3) गोविंदाग्रज (4) रेंदाळकर

24. "नच सुंदरी करू कोपा । मजवरि धरि अनुकंपा ।।" हे नाट्यपद कोणत्या पात्राच्या मुखी आहे ?

(1) धैर्यधर (2) आश्विन शेट

(3) श्रीकृष्ण (4) नारद

Prepp Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide

25. काव्य संग्रह व कवयित्री यांच्या जोड्या लावा

| | | | |
|---|---|---|---|
| I. | आकाशवेडी | (A) | इंदिरा |
| II. | रंगबावरी | (B) | पद्मा |
| III. | गोंदण | (C) | अश्विनी धोंगडे |
| IV. | स्त्रीसूक्त | (D) | शांता शेळके |
| | | (E) | पद्मा लोकूर |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | A | B | C | D |
| (2) | D | C | B | A |
| (3) | A | C | D | B |
| (4) | B | A | D | C |

26. 'मूकनायक' हे नाटक कोणी लिहिले ?

(1) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
(2) मामा वरेरकर
(3) प्रल्हाद केशव अत्रे
(4) मो.ग. रांगणेकर

27. 'प्रतिनिधी' या कादंबरीचे लेखक कोण ?

(1) विश्राम बेडेकर
(2) वसंत वरखेडकर
(3) जयवंत दळवी
(4) उद्धव शेळके

28. कोणता कथासंग्रह जी.ए. कुलकर्णी यांचा नसून आनंद विनायक जातेगावकर यांचा आहे ?

(1) पारवा
(2) मुखवटे
(3) रमलखुणा
(4) निळासावळा

29. 'सूत्रपाट' या ग्रंथाचे विदेशी अभ्यासक कोण ?

(1) गुंथर सोंथायमर
(2) आय.एम.पी. रेसाईड
(3) एलिनॉर झेलियट
(4) ॲन फेल्डहौस

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide

30. पुढीलपैकी कोणते प्रवासवर्णन पु.ल. देशपांडे यांचे नाही.

(1) पूर्वरंग (2) अपूर्वाई

(3) जावे त्याच्या देशा (4) जपान कसा दिसला

31. 'भगवद्गीते'चे मराठी भाषांतर कोणी केले ?

(1) ज्ञानेश्वर (2) वामनपंडित

(3) लोकमान्य टिळक (4) विनोबा भावे

32. 'झुंज' हे गॉल्सवर्दी यांच्या 'स्ट्राइक'चे भाषांतर कोणी केले ?

(1) अरुण नाईक (2) अनंत काणेकर

(3) वि.वा. शिरवाडकर (4) म.ना. लोही

33. काव्यामध्ये व्यंग्यार्थप्रधान्य असते त्यास पुढीलपैकी कोणती संज्ञा देतात ?

(1) उपमा (2) ध्वनी

(3) वाच्य (4) लक्षण

34. तात्पर्यवृत्तीमुले बोधित होणारा अर्थ 'तात्पर्यार्थ' होय व या तात्पर्यार्थाचे बोधक के वाक्य होय, हे मत पुढीलपैकी कोणाचे ?

(1) अन्विताभिधानवादाचे (2) अभिहितान्वयवादाचे

(3) अखण्डार्थवादाचे (4) लौकिकवादाचे

35. 'सौन्दर्यम् अलङ्कार:' असे कोणी म्हटले आहे ?

(1) भामह (2) दण्डी

(3) जगन्नाथ (4) वामन

Prepp
Your Personal Exams Guide

36. मम्मटाने मानलेल्या साहित्यप्रयोजनात पुढीलपैकी कोणते प्रयोजन आढळत नाही ?

(1) यश (2) अर्थप्राप्ती

(3) आत्माविकार (4) व्यवहार

37. कला किंवा सौंदर्य ही स्वभावत:च एक वादग्रस्त संकल्पना आहे. ही भूमिका कोणाची ?

(1) होरेस (2) कांट

(3) हेगेल (4) गॅली

38. समीक्षेच्या पद्धती म्हणजे साहित्याच्या आकलनाचे विविध पर्याय असले, तरी कोणतीही एकच समीक्षा पद्धती साहित्याच्या आकलनासाठी महत्त्वाची ठरते.

(1) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) संपूर्ण विधान बरोबर

39. समाजशास्त्रीय समीक्षेचे पहिल्यांदा सिद्धान्तन कोणी केले ?

(1) कार्ल मार्क्स (2) प्लेटो

(3) व्हिको (4) हिपोलीन तेन

40. अस्तित्ववादात वैफल्यदर्शन अपरिहार्यपणे येत असले, तरी जीवनातील वैफल्यभावाला धीरोदात्तपणे सामोरे जाण्याची प्रक्रिया ही अस्तित्ववादात अनस्यूत आहे.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

41. शैली ही मूळ भाषेतच अभिव्यक्त होते असे म्हणणाऱ्या कोलरिजपासून आय.ए.रिचर्ड्स यांनी कलाकृतीच्या संरचनेवर अधिक भर दिला, त्यामुळे शैली विचाराला टिकाशास्त्रात असाधारण महत्त्व प्राप्त झाले.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

Prepp Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide

42. समीक्षक व त्यांचे समीक्षा ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| I. | परंपरा आणि नवता | (A) | के.रं. शिरवाडकर |
| II. | शक्तिसौष्ठव | (B) | गो.म. कुलकर्णी |
| III. | साद-पडसाद | (C) | गो.वि. करंदीकर |
| IV. | किमया | (D) | द.ग. गोडसे |
| | | (E) | माधव आचवल |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | D | B | E | A |
| (2) | C | D | B | E |
| (3) | A | C | D | B |
| (4) | D | E | B | A |

43. आख्यातार्थ व्यक्त करण्याने कार्य जसे प्रत्यय करतात, तसे कार्य संयुक्त कियापदासारखे शब्ददेखील करतात.

(1) संपूर्ण विधान चूक
(2) संपूर्ण विधान बरोबर
(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

44. "मी कामासाठी नागपूरला गेलो." या वाक्यातील 'कामाला' ह्या शब्दातील विभक्ती कोणती ?

(1) द्वितीया
(2) चतुर्थी
(3) सप्तमी
(4) तृतीया

45. "गोव्यास जात असताना सावंतवाडीस उजाडले", ह्या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) भावकर्तरिप्रयोग
(2) कर्मभाव-संकरप्रयोग
(3) कर्तृ-भाव-संकरप्रयोग
(4) कर्मकर्तरी प्रयोग

Prepp
Your Personal Exams Guide

46. कर्तरीप्रयोग, कर्मणिप्रयोग, युधिष्ठिर, तोंडीलावणे, अग्रेसर ह्या शब्दांतील समास कोणता ?

(1) विभक्ति-तत्पुरुष समास (2) अलुक् – तत्पुरुप समास

(3) नञतत्पुरुष समास (4) उपपदतत्पुरुष समास

47. 'पाउस पडता तर हवेत गारवा आला असता' – ह्या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) अकरणरूपी वाक्य (2) संकेतार्थी वाक्य

(3) विध्यर्थी वाक्य (4) संयुक्त वाक्य

48. वृत्त लेख म्हणजे काय ?

(1) एखाद्या बातमीचे कथन करणे

(2) बातमीचे महत्त्व विस्तृत प्रमाणात पटवून देणे

(3) एखादी घटना किंवा प्रसंग या संदर्भात नजिकच्या काळात वृत्तांत देणे

(4) व्यक्ति चित्रणात्मक लेखन करणे

49. बातमी परिपूर्ण आणि साधार असावी, ती वाचल्यानंतर तिच्यातील तथ्याबद्दल वाचकाच्या मनात कसलीही शंका राहू नये.

(1) संपूर्ण विधान बरोबर

(2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(4) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

50. 'तीर्थ स्वरूप' असा पत्राचा मायना कोणासाठी लिहिला जात नाही ?

(1) काका-काकू (2) आई-वडील

(3) मामा-मामी (4) आजोबा-आजी

---

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Space For Rough Work

Prepp Your Personal Exam Guide